राष्ट्रोध्दाराय तंत्र शिक्षणम्

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४

Email ID: rppune@dtemaharashtra.gov.in

महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२, ई, शिवाजीनगर, पुणे-४११ ०१६.

जा.क्र.तंशिविकापु/आस्था-३(अ)/बायोमॅट्रीकउपस्थिती/२०२०/1393                    दिनांक- 16 MAR 2020

## परिपत्रक –

**विषय- कोरोना विषाणू प्रसारास प्रतिबंधात्मक उपाय म्हणून बायोमॅट्रीक उपस्थिती प्रणालीचा वापर मर्यादित कालावधीसाठी स्थगित करणेबाबत.**

संदर्भ- १)सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र समय २०२०/प्र.क्र.३१/१८(र.प.का) दि.१६/०३/२०२०

२) संचालनालयाचे परिपत्रक क्र.१२/आस्था(२)/२०२०/१४०, दि.१६/०३/२०२०

या कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या सर्व शासकीय व अशासकीय अनुदानित संस्था यांना वरील संदर्भान्वये सूचित करण्यात येते की, सद्यस्थितीत जगभरातील बहुतांश देशामध्ये कोरोना विषाणूंचा प्रसार होत असून आरोग्यविषयक गंभीर परिणाम तसेच जिवित हानी होत असल्याचे दिसून येत आहे. कोरोना विषाणूंचा प्रसार राज्यातील कार्यालयांमध्ये होवू नये तसेच राज्यातील अधिकारी/कर्मचारी यांना संसर्ग होवू नये.

त्याअनुषंगाने सर्व अधिकारी/कर्मचारी यांची आरोग्यविषयक बाब विचारात घेता बायोमॅट्रीक उपस्थिती प्रणालीचा वापर पुढील आदेशापर्यत स्थगिती देण्यात येत आहे. सदर कालावधीमध्ये सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांनी त्यांची उपस्थिती हजेरीपत्रक पटावर नोंदविण्यात यावी, याची सर्व अधिकारी /कर्मचारी यांनी नोंद घ्यावी.

सदर परिपत्रक आपल्या अधिपत्याखालील सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून त्यांची स्वाक्षरी घ्यावी व तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

(डॉ. दि. रा. नंदनवार)
प्र. सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत :-१) प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेसाठी.

२)संचालक/उपसचिव,प्राचार्य,
सर्व शासकीय पदवी/पदविका संस्था/कार्यालये यांना माहिती व कार्यवाहीसाठी